लोकमत






शिवाजी विद्यापीठाच्यावतीने आयोजित करण्यात आलेल्या जिल्हा स्तरीय युवा महोत्सवात विविध कला सादर करताना महाविद्यालयीन विद्यार्थी. मूकनाट्य आणि लोककलांनी महोत्सवात रंगत आणली.

## जिल्हा युवा महोत्सव : रंगमंचावर थिरकली पावले; ३१ महाविद्यालयांचा सहभाग

# कलेतून संस्कृती अन् विवेकाचा जागर

लोकमत न्यूज नेटवर्क

**सातारा :** पारंपरिक वाद्यांचा गजरात कोणी लोकनृत्याचे सादरीकरण करून संस्कृतीचे दर्शन घडविले, तर कोणी पथनाट्य व लोककलेतून विवेकाचा जागर केला. निमित्त होते सातारा जिल्हा युवा महोत्सवाचे. तब्बल दोन वर्षांच्या कालावधीनंतर विद्यार्थ्यांची पावले रंगमंचावर थिरकली अन् प्रत्येकाच्या आनंदाला उधाण आले.

कोरोनाच्या पार्श्वभूमीवर सांस्कृतिक कार्यक्रमांची परंपरा दोन वर्षांपासून खंडित झाली होती. शासनस्तरावर नियम शिथिल झाल्यानंतर शिवाजी विद्यापीठाच्या

### मध्यवर्ती युवा महोत्सवासाठी निवड

जिल्हा युवा महोत्सवात आठ रंगमंचावर १४ कलाप्रकारांचे सादरीकरण झाले. या महोत्सवात विजयी प्रत्येकी तीन संघ व विजेत्यांची गडहिंग्लज येथे होणाऱ्या मध्यवर्ती युवा महोत्सवासाठी निवड केली जाणार आहे.

### कोरोना नियमावलीचे पालन

संयोजकांकडून कोरोना नियमावलीचे काटेकोर पालन करण्यात आले. ज्या विद्यार्थ्यांचे लसीकरण पूर्ण झाले आहे. अशा विद्यार्थ्यांना व संघानाच महोत्सवात सहभागी करून घेण्यात आले. लसीकरण नसलेले तीन संघ महोत्सवातून बाद करण्यात आले.

जिल्हास्तरीय युवा महोत्सवाचे साताऱ्यातील छत्रपती शिवाजी महाविद्यालयात सोमवारी आयोजन करण्यात आले. रयतचे चेअरमन डॉ. अनिल पाटील, शिवलिंग मेनकुदळे, उपप्राचार्य रामराजे माने-देशमुख, सांस्कृतिक विभागप्रमुख रोशनआरा शेख, उपप्राचार्य अनिलकुमार वारके, शिवाजी विद्यापीठाच्या विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. आर. व्ही. गुरव, सातारा जिल्हा सांस्कृतिक विभागाचे समन्वयक चंद्रकांत माने यांच्या प्रमुख उपस्थितीत दीपप्रज्वलन करून महोत्सवास प्रारंभ झाला.

या महोत्सवात एकांकिका, लघुनाटिका, पथनाट्य, समूहगीत, लोकनृत्य, लोककला, वाद्यवृंद, निबंधलेखन, फोटोग्राफी, रांगोळी, गायन, पोस्टर मेकिंग, वादविवाद, वक्तृत्व अशा सांघिक व वैयक्तिक स्पर्धा पार पडल्या. एकूण १४ कलाप्रकारांसाठी महाविद्यालयात आठ रंगमंच तयार करण्यात आले होते.

समूह गायनमध्ये २३, लोकसंगीत वाद्यवृंद ३, वक्तृत्व स्पर्धा मराठी ३१, हिंदी २१, तर इंग्रजी वक्तृत्व स्पर्धेत १७ संघांनी सहभाग घेतला. याशिवाय सुगम गायन २४, वादविवाद १३, तर पथनाट्य स्पर्धेत १६ संघ सहभागी झाले. विद्यार्थ्यांनी कोरोना काळात डॉक्टर, शिक्षक व समाजमाध्यमांनी दाखविलेली माणुसकी, हुंडाबळी, गर्भलिंग निदान अशा विषयांवर पथनाट्यातून जागृती करतानाच तृतीयपंथीयांच्या व्यथांना वाट मोकळी करून दिली. विद्यार्थ्यांनी घातलेला गोंधळ, देवीचा जागर अन् मराठी गीतांना विद्यार्थ्यांनी टाळ्या अन् शिट्ट्यांनी भरभरून दाद दिली.